# महाराष्ट्र शासन

# गृह विभाग अर्थसंकल्प : २०१६-१७

## समर्थन

### अर्थसंकल्प अध्ययन केंद्र

**समर्थन**, ११५, धुरी कॉमर्स प्लाझा, वसई रोड रेल्वे स्टेशन समोर, वसई (पू),

जि. पालघर -४०१ २०८, दूरध्वनी : ०२५०-२३९० १०३

Email: samarthanmumbai97@gmail.com

www.samarthanadvocacy.org

# समर्थन

संस्थापक अध्यक्ष : **स्व. सदानंद वर्दे**

संस्थापक : **श्री. विवेक पंडित**

अध्यक्ष : **श्री. प्रविण महाजन**

उपाध्यक्ष: **श्री. आशिष कुलकर्णी**

कार्याध्यक्ष: **श्री. संतोष पाटील**

सचिव : **श्री. सुशील शुक्ल**

संपादन :
**मुक्ता भारती**

संकलन:
**रुपेश कीर** -९८९२९३९६१७
**मॅकेन्झी डाबरे** - ९२७१७१४२८४

मांडणी व अक्षरजुळणी :
**प्रतिक्षा कोयंडे**
**सोनल सहस्त्रबुद्धे**

**नोंदणी क्रमांक:**
पब्लिक ट्रस्ट रजिस्ट्रेशन क्र.एफ -१८९०३, मुंबई
सोसायटी रजिस्ट्रेशन क्र. एम. एस. मुंबई
१५६७/९६ जीबीबीएसडी

**प्रकाशक (पत्रव्यवहार):**
समर्थन – ११५- धुरी कॉमर्स प्लाझा, वसई रोड
रेल्वे स्थानकासमोर,
वसई (पू), जि. पालघर -४०१ २०८
दूरध्वनी: ०२५०-२३९०१०३/४
Email:samarthanmumbai97@gmail.com
website: www.samarthanadvocacy.org


# लोकशाही बळकट करण्याकरिता उपेक्षितांचे 'समर्थन'

## समर्थन विषयी थोडेसे

धोरणात्मक प्रश्नांवर राज्यातील विविध उपेक्षित समाजघटक व धोरणकर्ते यांच्यामधील दुवा म्हणजे 'समर्थन'. राज्याच्या धोरणात्मक निर्णयांमध्ये उपेक्षितांच्या आशा-आकांक्षा प्रतिबिंबीत व्हाव्यात, त्यासाठी लोकशाही यंत्रणा अधिक लोकाभिमुख व्हाव्यात हा समर्थनचा उद्देश. समर्थन उपेक्षितांच्या न्याय्य हक्कांचे, त्यांच्या संघर्षाचे.

## 'समर्थन'च्या कामाचे विविध स्तर

◊ ग्रामीण संघटनांकडून व ग्रामीण पत्रकारांकडून येणारे लोकांचे प्रश्न समजून घेणे.

◊ प्रश्नांना राज्यस्तरावर प्रसारमाध्यमांद्वारे प्रसिद्धी देणे.

◊ प्रश्नांवर विविध स्तरांवर चर्चा घडवून आणणे.

◊ विधिमंडळ सदस्यांपर्यंत प्रश्न पोहोचविणे.

◊ राज्य स्तरावर विविध लोकशाही यंत्रणांकडे, प्रशासनाकडे प्रश्नांचा पाठपुरावा करणे.

◊ आवश्यक असल्यास न्याययंत्रणेकडे दाद मागणे.

◊ ग्रामीण कार्यकर्ते व ग्रामीण पत्रकारांच्या क्षमता व कौशल्ये वाढावित यासाठी प्रशिक्षण देणे.

◊ लोकशाही यंत्रणेबाबतची माहिती प्रसारित करणे.

◊ अर्थसंकल्पासह राज्याच्या महत्त्वाच्या धोरणांचे विश्लेषण करणे.

# पुस्तिका वाचण्यापूर्वी थोडेसे. . .

- 'समर्थन'ची प्रकाशने सत्तेतील तसेच विरोधातील सन्माननीय सदस्यांना उपयुक्त व्हावीत यासाठी असतात.
- सदर माहिती पुस्तिकेचा उद्देश विधिमंडळ सभागृहांमध्ये राज्याच्या अर्थसंकल्पावर होणाऱ्या चर्चेत राज्याच्या अर्थसंकल्पातील माहिती सुलभपणे वाचता यावी आणि त्यामुळे विधिमंडळात दर्जेदार चर्चा व्हावी हा आहे.
- अर्थसंकल्प हा राज्याच्या धोरणाचा खराखुरा चेहरा असतो, प्राधान्यक्रमाचा आरसा असतो त्यामुळे अर्थसंकल्पातील तरतुदी राज्यातील दीन-दुर्बल घटकांच्या जीवनावर काय प्रभाव टाकतात यावर सभागृहात चर्चा व्हावी अशी अपेक्षा असते.
- माध्यमे जनमतावर प्रभाव टाकतात त्यामुळे धोरणकर्त्यांना त्याची दखल घ्यावी लागते. ही पुस्तिका माध्यम प्रतिनिधींनाही संदर्भ पुस्तिका ठरावी असा प्रयत्न आहे.
- सदरची माहिती अर्थसंकल्पीय प्रकाशने, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वित्तीय अहवाल, विनियोजन लेखे, शासनाच्या विविध विभागांनी, महामंडळांनी प्रकाशित केलेले अहवाल याच माहितीवर आधारित आहे. त्यात शासना व्यतिरिक्त अन्य संस्थांची मते अगर माहिती यांचा आधार घेतलेला नाही. त्यामुळे प्रत्येक माहितीखाली त्या माहितीचा स्त्रोत दिला आहे.
- तुलनात्मक अभ्यास करता यावा म्हणून २००८-०९ पासून २०१६-१७ पर्यंत अर्थसंकल्पातील प्रत्यक्ष खर्च आणि तरतूद समाविष्ट केली आहे.
- माहिती काटेकोरपणे तपासण्यात आली आहे. तरीही काही त्रुटी राहिल्यास त्या निदर्शनास आणल्यास ऋणी राहू.
- प्रकाशन अधिक माहिती पूर्ण सुलभ आणि प्रभावी व्हावे म्हणून आपल्या सूचनांचे स्वागत आहे.
- अर्थसंकल्पविषयक अधिक माहिती जाणून घेण्याची कुणाची इच्छा असल्यास या विषयातील अनुभवी पत्रकार, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ, विषयतज्ज्ञ तसेच निवृत्त सनदी अधिकारी यांचेमार्फत प्रत्यक्ष चर्चा घडवून आणण्याची जबाबदारी समर्थन स्वीकारीत आहे.

- विवेक पंडित
संस्थापक, समर्थन
९८२३१४७००३
pvivek2308@gmail.com

# गृह विभाग

## ठळक वैशिष्ट्ये :

- ☞ १८ वर्षाच्या आतील बालिकांवरील बलात्कारामध्ये २०१३ च्या तुलनेत २०१४ मध्ये ९०.१९ टक्के वाढ.
- ☞ १४ ते १८ वयोगटाच्या स्त्रियांवरील बलात्कारामध्ये २०१३च्या तुलनेत २०१४ मध्ये ९०.१९ टक्के वाढ.
- ☞ स्त्रियांवरील अत्याचाराचे ९२.२ टक्के गुन्हे विविध न्यायालयांमध्ये प्रलंबित.
- ☞ २०१३च्या तुलनेत २०१४ मध्ये अनुसूचित जातीवरील अत्याचाराचे गुन्ह्यांमध्ये ५.४ टक्के वाढ व अनुसूचित जमातीवरील अत्याचाराचे गुन्ह्यांमध्ये ६.५९ टक्के वाढ आहे.
- ☞ तपासासाठी असलेल्या एकूण भा. दं. वि. गुन्ह्यांपैकी ६१.७ टक्के गुन्ह्यात तपास पूर्ण करण्यात आला. त्यापैकी ६५.२४ टक्के गुन्ह्यात दोषारोपपत्र पाठविले.
- ☞ सन २०१४ मध्ये राज्यात भा. दं. वि. गुन्ह्यांचे शाबितीचे प्रमाण १९.३टक्के आहे.
- ☞ ३२ लाख ६८ हजार २८४ व्यक्तींच्या (राज्याच्या लोकसंख्येच्या २.८टक्के) भा. दं. वि. खटल्यांची सुनावणी विविध न्यायालयांसमोर प्रलंबित.
- ☞ सन २०१४ मध्ये कर्तव्यावर असलेल्या एकूण जखमी पोलिसांपैकी ३१.५७टक्के पोलीस बेकायदेशीर जमावाने केलेल्या हल्ल्यात जखमी.
- ☞ सन २०१४ मध्ये राज्यात १६३०७ व्यक्तींनी आत्महत्या केल्या. १३५२९ व्यक्ती रस्त्यावरील अपघातात मृत्यू पावल्या.
- ☞ सन २०१४ मध्ये संगणक / सायबर गुन्ह्यांत गतवर्षीच्या तुलनेत १०७ टक्के वाढ झाली.
- ☞ राज्यात सन २०१४ मध्ये २०२२८४ वाहने चोरीस गेली व त्यापैकी २३.५७टक्के वाहने मिळून आली.
- ☞ राज्यात सन २०१४ मध्ये १ लाख लोकसंख्येमागे सर्वात कमी ६४ पोलीस पुणे ग्रामीण, ६७ पोलीस अहमदनगर, तर ७१ पोलीस कोल्हापूर या घटकात प्रत्यक्ष कार्यरत होते.
- ☞ २०१४ मध्ये ३.८४ लाख दखलपात्र गुन्हे दाखल, २०१३चे तुलनेत ७.३४टक्के वाढ.
- ☞ २०१४ या वर्षात भा. दं. वि. प्रमाणे २.४९ लाख व विशेष आणि स्थानिक कायद्यांप्रमाणे १.३४ लाख गुन्हे दाखल.
- ☞ दर ३ मिनिटास सरासरी २ दखलपात्र गुन्हे दाखल.
- ☞ भा. दं. वि. प्रमाणे सरासरी १ गुन्हा प्रति २ मिनिटास तर विशेष आणि स्थानिक कायद्याप्रमाणे सरासरी १ गुन्हा प्रति ४ मिनिटास दाखल.
- ☞ राज्याचे भा. दं. वि. गुन्ह्यांचे प्रमाण २१२.३ आहे. गुन्ह्यांचे सर्वाधिक प्रमाण नागपूर शहर या घटकामध्ये ३८७.१ (१ लाख लोकसंख्येशी)

☞ मागील वर्षापेक्षा भा. दं. वि. प्रमाणे दाखल झालेल्या गुन्ह्यांत ६.५९ टक्के वाढ.

☞ एकूण भा. दं. वि. चे प्रमाण गुन्ह्यांपैकी ३.२५ टक्के भाग अल्पवयीन गुन्ह्यांचा.

☞ एकूण भा.दं.वि.चे गुन्ह्यांपैकी ३९.४४ टक्के गुन्हे ९ मोठ्या शहरांमध्ये (आयुक्तालयांमध्ये) दाखल, त्यापैकी ४०.९३ गुन्हे एकट्या मुंबई शहरात दाखल.

☞ दरोड्याचे गुन्ह्यात २०१३ च्या तुलनेत २०१४ मध्ये ६.२टक्के वाढ.

☞ २०१३ च्या तुलनेने २०१४ मध्ये जबरी चोरीचे गुन्ह्यात २.९ टक्के घट

☞ स्त्रियांवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांत २.१६ टक्के वाढ. सर्वाधिक गुन्हे मुंबई शहरात (३८९५) दाखल असून संपूर्ण महाराष्ट्राचे गुन्ह्यांचे प्रमाण (दर १ लाख स्त्री लोकसंख्येस) ४७.५५ तर सर्वाधिक गुन्ह्यांचे प्रमाण यवतमाळ येथे (१०८.८१).

## सन २०१४ मधील महाराष्ट्र राज्यातील गुन्हेगारीची भारतातील गुन्हेगारीशी तुलना :

### भा. दं. वि. खालील दाखल गुन्ह्यांचा कल:

☞ देशामध्ये भा. दं. वि. खालील एकूण २८,५१,५६६ गुन्हे दाखल असून, त्यापैकी महाराष्ट्र राज्यात २,४९, ८३४ (८.८%) गुन्हे व मध्य प्रदेशात २,७२,४२३ (९.६%) एवढे गुन्हे दाखल आहेत. लोकसंख्येच्या प्रमाणानुसार देशामध्ये भा. दं. वि. खालील दाखल गुन्ह्यांचे प्रमाण (क्राइम रेट- दर एक लाख लोकसंख्येस गुन्ह्यांची संख्या) (२२९.२) एवढे असून महाराष्ट्र राज्याचे गुन्हे प्रमाण (२१२.३) एवढे आहे.

### खून: खुनाच्या गुन्ह्यात उत्तर प्रदेश, बिहार पाठोपाठ जबरी चोरी, दरोडा, घरफोडीत महाराष्ट्र नंबर एक.

☞ देशात खून या गुन्हे शीर्षकाखाली, दाखल गुन्ह्यांमध्ये प्रमुख राज्यांच्या तुलनेत उत्तर प्रदेश (५१५०) पहिल्या क्रमांकावर, बिहार (३४०२) दुसऱ्या स्थानावर, त्यानंतर महाराष्ट्र (२६७०) तिसऱ्या स्थानी आहे.

☞ देशातील मोठ्या शहरात दाखल गुन्ह्यांमध्ये दिल्ली शहर (४७२), बेंगलुरू (२४१), पाटणा(२०५), मुंबई (१८३), चेन्नई (१६१) मुंबई चौथ्या स्थानावर आहे.

### दरोडा : महाराष्ट्राचा दरोड्यात पहिला क्रमांक ८८५ गुन्हे

☞ देशात दरोड्यांच्या दाखल गुन्ह्यांमध्ये महाराष्ट्र (८८५), बिहार (५३८) ओडिशा (४८४), गुजरात (२९६), उत्तर प्रदेश (२९४) असा क्रम आहे. गुन्हे प्रमाणामध्ये महाराष्ट्राचा पहिला क्रमांक आहे.

☞ देशातील मोठ्या शहरात दाखल गुन्ह्यांमध्ये पुणे (९२), दिल्ली शहर (६५), बेंगलुरू (५१), मुंबई (३४), पाटणा (२८) असा क्रम असून मुंबई चौथ्या स्थानावर आहे.

### जबरी चोरी : महाराष्ट्राचा जबरी चोरीत पहिला क्रमांक ९४६६ गुन्हे

☞ देशात जबरी चोरीच्या गुन्ह्यांमध्ये महाराष्ट्र (९४६६), दिल्ली (६४६४), उत्तर प्रदेश (३९२०), कर्नाटक (२५१६) व मध्यप्रदेश (१९६९) गुन्हे दाखल आहेत. गुन्हे प्रमाणामध्ये महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक आहे.

☞ देशातील मोठ्या शहरात दाखल गुन्ह्यांमध्ये दिल्ली शहर (५८४७), मुंबई (२०९४), बेंगलुरू (१०६७), पुणे (८७३), नागपूर (५०५) गुन्हे दाखल आहेत. गुन्हे प्रमाणामध्ये मुंबई शहर दुसऱ्या स्थानावर आहे.

### चोरी:

☞ देशातील चोरीच्या दाखल गुन्ह्यांमध्ये दिल्ली (७८७५३), महाराष्ट्र (५६२८३), उत्तर प्रदेश (४८३८०), मध्यप्रदेश (२९२४४), व राजस्थान (२९०९५) असा क्रम आहे. गुन्हे प्रमाणामध्ये महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे.

☞ देशातील मोठ्या शहरामध्ये चोरीच्या दाखल गुन्ह्यांमध्ये दिल्ली शहर (७१९३७), बेंगलुरू (११४५५), नंतर मुंबई शहर (१०१०१) असा क्रम आहे. गुन्हे प्रमाणामध्ये मुंबई शहर तिसऱ्या क्रमांकावर आहे.

### घरफोडी : महाराष्ट्राचा घरफोडीत पहिला क्रमांक १७१७१ गुन्हे

☞ देशात घरफोडीचे महाराष्ट्र (१७१७१), मध्यप्रदेश (१२११०), दिल्ली (१०३०९), उत्तर प्रदेश (६९२१) व हरियाणा (६७१७) असे गुन्हे दाखल आहेत. गुन्हे प्रमाणामध्ये महाराष्ट्राचा १ला क्रमांक आहे.

☞ देशातील मोठ्या शहरात दाखल गुन्ह्यांमध्ये दिल्ली शहर (८९३९), मुंबई (३०५५), बेंगलुरू (१५४२), इंदौर (१३८८) व पुणे (१३६२) असे गुन्हे दाखल आहेत. गुन्हे प्रमाणामध्ये मुंबई शहर दुसऱ्या स्थानावर आहे.

### दंगा : दंग्यात व विश्वासघात यामध्ये बिहारनंतर महाराष्ट्र नंबर दोन

☞ देशामध्ये दंगा या गुन्हे शीर्षकाखाली बिहार (१३५६६), महाराष्ट्र (७७६०), कर्नाटक (६५२०) उत्तर प्रदेश (६४३८) व केरळ (५८२०) असे गुन्हे दाखल आहेत. गुन्हे प्रमाणामध्ये महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक आहे.

☞ देशातील मोठ्या शहरात दाखल गुन्ह्यांमध्ये पाटणा (४७०), मुंबई (४०९), बेंगलुरू (३८८), कोलकाता (३१५), कोलम (३०१) असे गुन्हे दाखल आहेत. गुन्हे प्रमाणामध्ये मुंबई शहर दुसऱ्या क्रमांकावर आहे.

### अन्यायाने विश्वासघात:

☞ अन्यायाने विश्वासघात या गुन्हे शीर्षकाखाली देशामध्ये उत्तर प्रदेश (४०७४) नंतर महाराष्ट्र (१९५८), आसाम (१९५२), पश्चिम बंगाल (१९२१) व बिहार (१२१९) असे गुन्हे दाखल आहेत. गुन्हे प्रमाणामध्ये महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक आहे.

☞ देशातील मोठ्या शहरामध्ये या गुन्हे शीर्षकाखाली मुंबई शहर (६७२), दिल्ली शहर (५९३), लखनौ (४५९), कोलकाता (३३८) व जयपूर (३२०) असे गुन्हे दाखल आहेत. गुन्हे प्रमाणामध्ये मुंबई शहर पहिल्या क्रमांकावर आहे.

### ठकबाजी :

☞ देशात ठकबाजी या गुन्हे शीर्षकाखाली राजस्थान (२११९१), उत्तर प्रदेश (१०६३६), महाराष्ट्रात (९९५९) व तेलंगणा (८५१९), कर्नाटक (६९३५) असे गुन्हे दाखल आहेत. गुन्हे प्रमाणामध्ये महाराष्ट्राचा तिसरा क्रमांक आहे.

☞ देशातील मोठ्या शहरामध्ये या गुन्हे शीर्षकाखाली जयपूर (४६३४) दिल्ली शहर (४११९), बेंगलुरू (३०४५), मुंबई शहर (२५९४), हैद्राबाद (२५५७) असे गुन्हे दाखल आहेत. गुन्हे प्रमाणामध्ये मुंबई शहर चौथ्या क्रमांकावर आहे.

**दुखापत :**

☞ दुखापत या गुन्हे शीर्षकाखाली देशामध्ये पश्चिम बंगाल (१७८७७), बिहार (१७३५१), मध्य प्रदेश (१२११३), उत्तर प्रदेश (१०८६७) नंतर महाराष्ट्र (८१२६) असे गुन्हे दाखल आहेत. गुन्हे प्रमाणामध्ये महाराष्ट्राचा पाचवा क्रमांक आहे.

☞ देशातील मोठ्या शहरामध्ये या गुन्हे शीर्षकाखाली पाटणा (२५१५), मुंबई शहर (२००६), कोलकाता (९०५) दिल्ली शहर (६०६), पुणे (४७०), असे गुन्हे दाखल आहेत. गुन्हे प्रमाणामध्ये मुंबई शहर दुसऱ्या क्रमांकावर आहे.

**स्त्रियांवरील अत्याचाराचे गुन्हे : महाराष्ट्रात महिलांवरील अत्याचाराचे २६६९३ गुन्हे**

☞ देशामध्ये स्त्रियांवरील अत्याचाराचे एकूण ३,३७,९२२ गुन्हे दाखल असून राज्यनिहाय दाखल गुन्हे व त्याचा वाटा, उत्तर प्रदेश ३८४६७ (११.४%), पश्चिम बंगाल ३८२९९ (११.३%), राजस्थान ३११५१ (९.२%), मध्य प्रदेश २८६७८ (८.५%), महाराष्ट्र २६६९३ (७.९ %) असा आहे.

**बलात्कार: महाराष्ट्रात ३४६८ बलात्कार**

☞ देशात बलात्काराचे मध्यप्रदेश ५०७६ (१३.८%), राजस्थान ३७५९ (१०.२%), उत्तर प्रदेश ३४६७ (९.४%), व महाराष्ट्र ३४३८ (९.४%) दिल्ली २०९६ (५.७%) असे गुन्हे दाखल आहेत.

**हुंडाबळी: महाराष्ट्रात २५९ हुंडाबळी**

☞ देशात हुंडाबळीचे उत्तर प्रदेश २४६९ (२९.२%), बिहार १७७३ (१६.२%) व महाराष्ट्र २५९ (३.३%) असे गुन्हे दाखल आहेत.

**विनयभंग : १००१ विनयभंगाचे गुन्हे, महाराष्ट्राचा देशात क्रमांक एक**

☞ देशात विनयभंगाचे दाखल गुन्हे व त्याचा राज्यनिहाय वाटा महाराष्ट्र १०००१ (१२.२%), मध्यप्रदेश ९६०९ (११.७%), उत्तर प्रदेश ८६०५ (१०.५%), राजस्थान ५९९९ (७.३%), पश्चिम बंगाल ५६७०(६.९%) असा आहे.

**लैंगिक छळ: १५७५ लैंगिक छळाचे गुन्हे. महाराष्ट्राचा देशात क्रमांक दोन**

☞ देशात लैंगिक छळ या गुन्हे शीर्षकाखाली आंध्रप्रदेश २६४९ (२७.२ %) व महाराष्ट्र राज्यात १५७५ (१६.२%) असे गुन्हे दाखल आहेत.

**पती किंवा पतीच्या नातेवाईकांकडून छळ:**

☞ देशात या गुन्हे शीर्षकाखाली दाखल गुन्हे व राज्यनिहाय वाटा, पश्चिम बंगाल २३२७८(१८.९%) राजस्थान १५९०५(१२.९%), उत्तर प्रदेश १०४७१(८.५%), आसाम ९६२६ (७.८%) व महाराष्ट्र राज्यात ७६९६ (६.३%) असा आहेत.

**अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा:**

☞ देशात या गुन्हे शीर्षकाखाली दाखल गुन्हे व राज्यनिहाय वाटा, तामिळनाडू ४७१(२२.८%), आंध्रप्रदेश ३८८(१८.७%) व महाराष्ट्र राज्यात २०२(९.८%) असा आहे.

### अनुसूचित जातीच्या सदस्यांवरील अत्याचाराचे गुन्हे :

☞ देशामध्ये अनुसूचित जातीच्या सदस्यांवरील अत्याचाराबाबतच्या एकूण दाखल ४७,०६४ गुन्ह्यांपैकी, दाखल गुन्हे व राज्यनिहाय त्याचा वाटा, उत्तर प्रदेश ८०७५ (१७.२%), राजस्थान ८०२८ (१७.१%), बिहार ७८९३(१६.८%), मध्य प्रदेश ४१५१ (८.८%), आंध्रप्रदेश ४११४ (८.७%) महाराष्ट्र १७६८ (३.८%) असा आहे.

### बालकांवरील अत्याचाराचे गुन्हे :

☞ देशात बालकांवरील अत्याचाराबाबतच्या एकूण दाखल ८९,४२३ गुन्ह्यांपैकी, दाखल गुन्हे व राज्यनिहाय वाटा, मध्य प्रदेश १५०८५ (१६.९%), उत्तर प्रदेश १४८३५ (१६.६%), दिल्ली ९३५० (१०.५ %), महाराष्ट्र ८११४ (९.१%), पश्चिम बंगाल ४९०९(५.५%) असा आहे.

## राज्यातील कारागृहे ओव्हरफ्लो

गुन्हा शाबीत न होताही अनेक जण तुरुंगात आहेत. अशा कच्च्या कैद्याचे प्रमाण तुरुंगातील बंदिवानात अधिक असल्याने राज्यातील अनेक तुरुंग ओव्हरफ्लो झाले आहेत. राज्यातील ५३ तुरुंगात २९ हजार १४८ कैदी असून कारागृहाची प्रत्यक्ष क्षमता २४ हजार ३१७ आहे म्हणजे २० टक्के जास्त कैदी कोंबले आहेत. त्यातील अनेक कच्चे कैदी निव्वळ जामीन मिळत नसल्याने खितपत पडले आहेत.

## कैद्यांना मूलभूत सुविधा द्या !

राज्यातील तुरुंगांमध्ये कैद्यांना चांगले अन्न, स्वच्छ व आरोग्यदायी स्नानगृहे व शौचालये, पिण्याचे स्वच्छ पाणी अशा मूलभूत सुविधा पुरवाव्यात, असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने राज्यातील सर्व तुरुंग अधीक्षकांना दिले आहेत. तसेच अर्थरोड तुरुंगाचा अहवाल मागविला असता या तुरुंगात ८०४ एवढ्या क्षमतेपेक्षा तिप्पट म्हणजे २ हजार ४६६ कैदी असल्याचे समोर आले आहे. तसेच या तुरुंगातही राज्यातील इतर तुरुंगाप्रमाणेच मूलभूत सोयी सुविधांचा मोठा अभाव असल्याचे निदर्शनास आले आहे.

## राज्यातील कैद्यांची स्थिती सुधारण्यासाठी शासन हे करेल का ?


☞ राज्यातील कच्च्या कैद्यांना जामीन मिळविण्यासाठी कायदेविषयक मदत मिळत नाही. जर अशाप्रकारची मदत पुरवली गेली व कारागृहातच न्यायालय भरविले गेले तर तेथील गर्दी कमी होऊन त्यावरील ताणही हलका होण्यास मदत होईल.

☞ न्यायाधीशांची संख्या वाढवून प्रलंबित खटल्याची दररोज सुनावणी घेतली आणि सुनावणीसाठी दर दिवशी अधिक खटले घेतले. तरी अशा ओव्हरफ्लो झालेल्या कारागृहांना दिलासा मिळेल.

☞ पुण्यातील येरवडा तुरुंगाची दैनावस्था मांडणारी फौजदारी जनहित याचिका ॲड. शेख इब्राहीम अब्दुल यांनी ॲड. उदय वारुंजीकर यांच्यामार्फत केली होती. याविषयी न्याय. विद्यासागर कानडे यांच्या खंडपीठाने पुण्यातील न्यायीक अधिकाऱ्यांचा पाहणी अहवाल मागविला होता. त्यात खरोखरच तुरुंगांची अवस्था वाईट असल्याचे निदर्शनास आले होते. त्याबाबत उच्च न्यायालयाने सर्वच तुरुंग अधीक्षकांना मूलभूत सुविधा योग्य स्वरुपात पुरविण्याचे आदेश दिले होते. याबाबतचा अहवाल सभागृहाने सर्व तुरुंग अधीक्षकांकडून मागवावा. जेणे करून तुरुंगाची प्रत्यक्ष स्थिती काय आहे हे कळू शकेल.

# गृह विभागाच्या अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा सुधारित अंदाज जास्त प्रत्यक्ष खर्च मात्र त्यापेक्षाही कमी

आलेख क्र. १ (रु. कोटीत)




| | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | ४१९० | ५१७२ | ७२८६ | ८२९२ | १००९० | १२०४३ | १३३४१ | १४६०० | १५०९० |
| सुधारित अंदाज | ५३३५ | ६५५२ | ७६६० | ८५१६ | १०५५४ | १२१४० | १३३३४ | १५०३३ | |
| प्रत्यक्ष खर्च | ५०८४ | ६५५५ | ७०९६ | ७७८६ | ९५८३ | १०९७९ | ११७३८ | | |

*(स्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका) वर्ष २०१५-१६ सुधारित अंदाज व वर्ष २०१६-१७ अर्थसंकल्पीय अंदाज)*


☞ **वर्ष २००८-०९ ते वर्ष २०१४-१५ पर्यंत गृह विभागाला वर्ष २००९-१०चा अपवाद वगळता प्रत्यक्ष खर्चासाठी सुधारित अंदाजाच्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला नसल्याचे दिसते.**

☞ **वर्ष २०१४-१५ मध्ये अर्थसंकल्पीय अंदाज रु. १३,३४१ कोटी असून देखील त्यावर्षी निधी उपलब्ध होण्याचे प्रमाण मात्र सर्वात कमी म्हणजेच रु. ११,७३८ कोटी (८८ टक्के) आहे.**

☞ **वर्ष २००८-०९ ते वर्ष २०१४-१५ या कालावधीत गृह विभागाला सरासरी रु. ८,४०३ कोटी इतका निधी उपलब्ध झाल्याचे दिसते.**

# राज्य अर्थसंकल्पाच्या १०० रुपयाच्या तुलनेत
# गृह विभागाला मिळतात फक्त ५.३० रुपये

आलेख क्र. २




| | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| टक्केवारी | ५.०५ | ५.५६ | ५.४१ | ५.५७ | ५.७९ | ५.८४ | ५.३९ | ६.०६ | ५.५७ |

*(स्त्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका, निव्वळ रकमा व खर्चाचा प्रधानशीर्षवार नि विभागवार सारांश व लोकलेखा)*
*वर्ष २०१५-१६ सुधारित अंदाज व वर्ष २०१६-१७ अर्थसंकल्पीय अंदाज)*

☞ **वर्ष २००८-०९ ते वर्ष २०१४-१५ या काळात गृह विभागावर एकूण राज्य अर्थसंकल्पाच्या तुलनेत सरासरी ५.५१ टक्के एवढाच निधी उपलब्ध झाला.**

☞ **वर्ष २००८-०९ मध्ये उपलब्ध निधी हा इतर वर्षांच्या तुलनेत कमी म्हणजेच ५.०५ टक्के दिसून येतो.**


☞ **वर्ष २०१३-१४ मध्ये गृह विभागाचे उपलब्ध निधीचे प्रमाण पाहता इतर वर्षाच्या तुलनेत जास्त म्हणजेच ५.८४ टक्के इतके होते.**

☞ **वर्ष २०१४-१५ मध्ये खर्चाचे प्रमाण ५.३९ टक्के असून, वर्ष २०१५-१६ मध्ये सुधारित अंदाजाचे प्रमाण हे ६.०६ टक्के आहे. परंतु तेवढा निधी उपलब्ध होणार नाही हे मागील अनुभवावरून सिध्द होते.**

☞ **वर्ष २०१६-१७ मध्ये अर्थसंकल्पीय अंदाज ५.५७ टक्के आहे.**

# गेल्या ७ वर्षात गृह विभागावर झालेला योजनांतर्गत खर्च सरासरी केवळ ३६५ कोटी रुपये

आलेख क्र.३ (रु. कोटीत)




| | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| योजनेतर | ४८८४ | ६३२८ | ६८०८ | ७२८० | ८९६२ | १०५८९ | ११४०६ | १४२३५ | १४४७६ |
| योजनांतर्गत | १९९ | २२७ | २८८ | ५०५ | ६२१ | ३९० | ३३१ | ७९७ | ६१४ |

*(स्त्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका, निव्वळ रकमा व खर्चाचा प्रधानशीर्षवार नि विभागवार सारांश व लोकलेखा)*
*वर्ष २०१५-१६ सुधारित अंदाज व वर्ष २०१६-१७ अर्थसंकल्पीय अंदाज)*

- **वर्ष २००८-०९ ते २०१४-१५ या ७ वर्षाच्या काळात योजनांतर्गत निधी सरासरी केवळ रु. ३६५.८५ कोटी उपलब्ध झाला तर योजनेतर निधी रु. ८ हजार ३६ कोटी ७१ लाख उपलब्ध झाले.**
- **वर्ष २०१४-१५ मध्ये रु. ११ हजार ७३८ कोटी निधी उपलब्ध झाला त्यापैकी योजनांतर्गत उपलब्ध झालेला निधी रु. ३३१ कोटी होता. एकूण अर्थसंकल्पात योजनांतर्गत खर्चाचे प्रमाण २.८१ टक्के होते तर योजनेतर खर्च रु. ११ हजार ४०६ कोटी होता त्याचे एकूण अर्थसंकल्पातील प्रमाण ९७.१७ टक्के एवढे प्रचंड होते.**
- **गृह विभागाचा एकूण अर्थसंकल्प वर्ष २०१५-१६ मध्ये रु. १४ हजार कोटींचा आकडा पार केला असला तरी योजनांतर्गत खर्चात मागील वर्षाच्या तुलनेत घट झाली आहे.**
- **२६/११च्या दहशतवादी हल्ल्यानंतर पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाची गरज असून देखील योजनांतर्गत खर्च अधिक होणे गरजेचे असताना वर्ष २०१४-१५ चा प्रत्यक्ष खर्च व २०१५-१६च्या सुधारित अंदाजाचा व २०१६-१७ च्या अर्थसंकल्पीय अंदाजाचा कल कायम दिसून येतो.**

# पोलीस


*"पोलीस हा जनतेच्या अनादराचा, गुरुवर्यांच्या टीकेचा, चित्रपटात विनोदाचा - टिंगल - टवाळीचा विषय आहे. वर्तमानपत्रातून त्याला कधीही श्रेय मिळत नाही. सरकारी वकील आणि न्यायाधीश यांच्या सहकार्याअभावी तो निराधार असतो आणि आदरणीय व्यक्तींकडून त्याला तिरस्कार मिळतो, अनेकविध प्रलोभने आणि धोके सतत त्याच्यासमोर उभेच असतात. तो जेव्हा कायद्याचा अंमल करतो तेव्हा त्याचा धिक्कार होतो आणि जेव्हा अंमल करीत नाही तेव्हा तो निलंबित होतो. त्याच्याकडून सैनिकाची, शांतीदूताची आणि शिक्षकाची अपेक्षा करीत असताना त्याला पगार मात्र रोजंदार मजूरापेक्षा कमीच दिला जातो."*

**- ऑगस्ट वॉल्लीमोर.**

## मुंबईवरील वाढत्या दहशतवादातून आम्ही कोणता धडा घेतला?

आलेख क्र.४ (रु. कोटीत)

पोलीस या मुख्य शीर्षावरील अंदाजित व प्रत्यक्ष खर्च




| | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अर्थसंकल्पीय अंदाज | ३३११ | ४२७२ | ६११७ | ६६४० | ७८३३ | ९४२० | १०४६९ | ११८५३ | ११५७९ |
| सुधारित अंदाज | ३९२१ | ४९२३ | ६३३० | ६७१९ | ८२११ | ९४२३ | १०३४३ | ११६३२ | |
| प्रत्यक्ष खर्च | ३७०५ | ५०३९ | ५८०७ | ६१४२ | ७२९३ | ८२२९ | ८९१३ | | |

*(स्रोत: खर्चाचा प्रधान शीर्षवार नि-विभागवार सारांश व लोकलेखा-मुख्य शीर्ष २०५५ व ४०५५ खालील २०१५-१६ सुधारित अंदाज व २०१६-१७ अंदाजित खर्च)*


☞ **२००८-०९ ते २०१४-१५ या कालावधीमध्ये वर्ष २००९-१०चा अपवाद वगळता पोलीस या मुख्य शीर्षासाठी शासनाने सुधारित अंदाजा इतका निधी उपलब्धच केला नसल्याचे दिसून येते.**

☞ **वर्ष २०१४-१५ मध्ये सुधारित अंदाज रु.१० हजार ३४३ कोटी असताना प्रत्यक्ष उपलब्ध झालेला निधी रु. १ हजार ४३० कोटी इतका कमी होऊन त्या वर्षातील खर्च रु. ८ हजार ९१३ कोटी इतका झाला आहे.**

☞ **वर्ष २०१५-१६ चे सुधारित अंदाज रु. ११ हजार ६३२ कोटी व वर्ष २०१६-१७ मधील अर्थसंकल्पीय अंदाज रु. ११ हजार ५७९ कोटी इतके असले तरी हे अंदाज प्रत्यक्षात उतरणे महत्त्वाचे ठरेल.**

# राज्याचा पोलिसांसाठी सरासरी उपलब्ध निधी फक्त ३.५ टक्के

आलेख क्र. ५




*(स्रोत : खर्चाचा प्रधान शीर्षवार-नि-विभागवार सारांश व लोकलेखा - मुख्य शीर्ष २०५५ व ४०५५ खालील अंदाजित व प्रत्यक्ष खर्च) वर्ष २०१५-१६चे सु. अंदाज व वर्ष २०१६-१७चे अर्थसंकल्पीय अंदाज)*

☞ **वर्ष २००८-०९ ते वर्ष २०१४-१५ या कालावधीत राज्याच्या उपलब्ध निधीच्या तुलनेत पोलीस या शीर्षावरील उपलब्ध होणारा निधीचे सरासरी प्रमाण हे फक्त ४.२७ टक्के दिसून येते.**

☞ **वर्ष २०१३-१४ च्या तुलनेत वर्ष २०१४-१५ मध्ये उपलब्ध झालेला निधी ०.२८ टक्क्यांनी घटला आहे.**

## पोलीस कोठडी की, मृत्यूचे सापळे?

**पोलीस कोठडीत वर्ष २००८ ते २०१५ या ८ वर्षाच्या दरम्यान २५५ संशयित आरोपींचा मृत्यू झाला आहे. वर्ष २०१५ च्या ऑक्टोबर अखेरपर्यंत ३१ जणांनी कोठडीत अखेरचा श्वास घेतला आहे. या कोठडीतील संशयीत मृत्यूंचा छडा लावण्याची जबाबदारी सी.आय.डी.कडे देण्यात येते. मात्र त्यांच्या तपासातील कासवगतीमुळे बहुतांश प्रकरणांचा तपास प्रलंबित असल्याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे. पोलीस कोठडीत संशयीत आरोपींच्या मृत्युचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले असून यापुढे कोठडीत एकही मृत्यू नको असे मुंबई हाय कोर्टाने बजावूनही कोठडीतील मृत्यूचे प्रमाण वाढतेच राहिले आहे. याबाबत न्यायालयाने पोलीस कोठडीत होणाऱ्या मृत्यूबाबत सरकारने पोलीस अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई केल्यास राज्यातील प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये योग्य संदेश जाईल आणि कोठडीत होणाऱ्या मृत्यूला आळा बसेल. यापुढे एकही कोठडीतील मृत्यू नको असे उच्च न्यायालयाने ठणकावले आहे.**

# राज्याचा गृह विभागावरील व पोलीस या मुख्य शीर्षावरील खर्चातील फरक

तक्ता क्र.१ (रु. कोटीत)

| वर्ष | गृह विभागावरील खर्च | पोलीस शीर्षावरील खर्च | टक्केवारी |
|---|---|---|---|
| २००५-०६ | ३,९०८ | २,३०९ | ५९.०८ |
| २००६-०७ | ४,४५९ | २,५७१ | ५७.६५ |
| २००७-०८ | ३,९१२ | ३,०५० | ७७.९६ |
| २००८-०९ | ५,०८४ | ३,७०५ | ७२.८७ |
| २००९-१० | ६,५५५ | ५,०३९ | ७६.८७ |
| २०१०-११ | ७,०९६ | ५,८०७ | ८१.८३ |
| २०११-१२ | ७,७८६ | ६,१४२ | ७८.८८ |
| २०१२-१३ | ९,५८३ | ७,२४८ | ७६.१० |
| २०१३-१४ | १०,९७९ | ८,२२९ | ७४.९५ |
| २०१४-१५ | ११,७३८ | ८,९१३ | ७५.९३ |
| २०१५-१६ (सु.अं) | १५,०३३ | ११,६३२ | ७७.३७ |
| २०१६-१७(अ.अं.) | १५,०९० | ११,५७९ | ७६.७३ |

*स्रोत : अर्थसंकल्पीय अंदाज पुस्तिका व खर्चाचा प्रधान शीर्षवार-नि-विभागवार सारांश व लोकलेखा - मुख्य शीर्ष २०५५ व ४०५५ खालील अंदाजित व प्रत्यक्ष खर्च*

☞ **वर्ष २००८-०९ ते वर्ष २०१४-१५ या कालावधीतील गृह विभागावरील एकूण खर्चाच्या तुलनेत पोलीस या शीर्षावरील खर्चाचे सरासरी प्रमाण ६६.७७ टक्के आहे म्हणजेच उर्वरित ३३.२२ टक्के खर्च हा तुरुंग, परिवहन, राज्य उत्पादन शुल्क आणि सर्वसाधारण (न्यायदान, होमगार्ड, नागरी संरक्षण, नागरिकत्व आणि राज्य मानवी हक्क आयोग) यावर केला होता.**

☞ **वर्ष २००८-०९ ते वर्ष २०१४-१५ पर्यंत पोलीस या शीर्षावर सरासरी रु.६ हजार ४४० कोटी निधी उपलब्ध झाला.**

☞ **वर्ष २०१३-१४शी तुलना करता वर्ष २०१४-१५ मध्ये गृह विभागाला उपलब्ध झालेल्या निधीत ६.९१ टक्के वाढ झाल्याचे दिसते. याचा अर्थ दहशतवादी हल्ल्याचा गृह विभागावर काहीच परिणाम झालेला दिसत नाही.**

### *पोलिसांवरील वाढता ताण : महाराष्ट्रात १ लाख लोकसंख्येमागे केवळ १५१ पोलीस*

*महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या ११ कोटी ७६ लाख एवढी असून २०१४ पर्यंतच्या आकडेवारीनुसार राज्यात प्रत्यक्ष पोलीस संख्याबळ २ लाख ६ हजार ९६२ आहे. म्हणजेच एक लाख लोकसंख्येसाठी १५१ पोलीस आहेत. तर एक लाख लोकसंख्येमागे सर्वात कमी ६४ पोलीस पुणे ग्रामीण, ६७ पोलीस अहमदनगर, तर ७१ पोलीस कोल्हापूर या घटकात प्रत्यक्ष कार्यरत होते.*

*- स्रोत : महाराष्ट्रातील गुन्हे २०१४*

### महाराष्ट्र राज्यात महिला पोलिसांचे प्रमाण नगण्य

***राज्यात २ लाख ६ हजार ९६२ पोलीस कार्यरत असून त्यापैकी महिलांची संख्या २५ हजार ३११ इतकी आहे. एकूण पोलीसांच्या प्रमाणात १२.६२% इतके कमी आहे. राज्यात महिलांची संख्या ५ कोटी ४१ लाख ३१ हजार असून त्याप्रमाणात महिलांची भरती पोलीस विभागात होणे गरजेचे आहे.***

***-आर्थिक पाहणी, २०१५ व महाराष्ट्रातील गुन्हे २०१४***

# बंदिवासातील पोलीस यंत्रणा

पोलिसांचे अधिकार व कर्तव्ये, पोलीस आणि जनता यांचे परस्पर संबंध, पोलिसांचा होणारा राजकीय वापर या मुद्द्यांचा विचार करता १५ नोव्हेंबर १९७७ मध्ये राष्ट्रीय पोलीस आयोगाची स्थापना करण्यात आली. परंतु राज्यकर्त्यांनी मात्र या आयोगाच्या शिफारशींना केराची टोपलीच दाखविली आहे. पोलिसांवरील गैरवाजवी राजकीय हस्तक्षेप रोखणे हा उदात्त हेतू डोळ्यासमोर ठेवून शासनातर्फे राज्य सुरक्षा मंडळ व पोलीस अधिकाऱ्यांविरोधी तक्रारीची दखल घेण्यासाठी पोलीस तक्रार प्राधिकरणाची २५ जुलै २००८ रोजी अधिसूचना जारी करण्यात आली. परंतु प्रत्यक्षात मात्र त्यांची अंमलबजावणी अजूनही झालेली नाही तसेच शासनाने पोलीस आस्थापना मंडळाची अधिसूचना देखील २५ जुलै २००८ रोजी जारी केली होती. अशाप्रकारच्या यंत्रणा या इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, कॅनडा, दक्षिण आयर्लंड येथे कार्यरत आहेत.

**अ) पोलीस आस्थापना मंडळ:**

सदर मंडळ समाधानकारक काम करीत असून अनेक ठिकाणी पोलीस उपनिरीक्षकाच्या दर्जाहून खालील अधिकाऱ्यांच्या बदल्या या पोलीस आस्थापना मंडळामार्फत होतात. या शासन निर्णयानुसार पोलीस उपनिरीक्षक व पोलीस निरीक्षक यांच्या बदल्या किंवा इतर सेवाशर्ती या आस्थापना मंडळाने करावयाच्या आहेत त्यापेक्षा कमी दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या नाही.

जिल्ह्यांतर्गत बदल्याबाबतचे अधिकार पोलीस अधिक्षक, अपर पोलीस अधिक्षक, पोलीस उपअधिक्षक (गृह) यांच्या आस्थापना मंडळामार्फत व्हावे असे आस्थापना मंडळ निर्माण करावे असे राज्यातील अनेक पोलीस अधिकाऱ्यांचे मत आहे.

**ब) पोलीस तक्रार प्राधिकरण :**

पोलीस तक्रार प्राधिकरण राज्य पातळीवर व जिल्हा पातळीवर स्थापन करण्यात आला आहे. असे असले तरी प्रत्यक्षात राज्यात व कोणत्याही जिल्ह्यात अंमलबजावणी झालेली नाही.

### राज्य मानवी हक्क आयोगाच्या संकेत स्थळाची सध्याची स्थिती

- ☞ ५ सप्टेंबर, २०११ रोजी संकेतस्थळाची सुरुवात केली गेली परंतु आज २०१६ चा मार्च महिना उजाडला तरीही या संकेतस्थळावर कोणत्याही स्वरुपाची माहिती अद्ययावत केलेली नाही.
- ☞ महाराष्ट्र मानवी हक्क आयोगाने आपले संकेतस्थळ तर सुरू कले आहे परंतु मानवी हक्क आयोगाबाबतची कोणतीच माहिती अद्ययावत नाही तसेच जी थोडीबहुत माहिती आहे ती वर्ष १० डिसेंबर, २०१२ मधील मानवी हक्क दिनाबाबत आहे.
- ☞ संकेतस्थळावर मानवी हक्क आयोगाचे अहवाल देखील ठेवलेले नाही. तसेच बातम्या व चालू घडामोडी याबाबतची माहिती २०१२ मधील म्हणजे २ वर्षा अगोदरची ठेवलेली आहे.
- ☞ देशातील राज्यनिहाय मानवी हक्क आयोगांची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध नाही. तसेच देशाच्या मानवी हक्क आयोगाबद्दल देखील माहिती उपलब्ध करून दिलेली नाही.
- ☞ मानवी हक्क आयोगाच्या संकेत स्थळावर राज्यातील लोकल्याणकारी संस्था, सामाजिक संस्थांचे नाव पत्ते, निरनिराळ्या प्राधिकरणाचे मदत क्रमांक देणे अपेक्षित असते परंतु अशा स्वरुपाची कोणतीही माहिती या संकेतस्थळावर उपलब्ध नाही.
- ☞ मानवी हक्क कायद्यासंदर्भात १९९३चा कायदा व त्यात झालेल्या सुधारणा, २००० साली तयार केलेल नियम व २००१ व २०११ मध्ये तयार केलेल्या अटी व शर्ती संकेतस्थळावर उपलब्ध करणे गरजेचे होते. परंतु ही माहिती संकेतस्थळावर नाही.

***पोलीस दलातील कर्मचाऱ्यांच्या संख्येबाबत मापदंड सुधारणा करण्याबाबत वर्ष २००३ मध्ये सराफ समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींवर शासनाने त्वरित निर्णय घ्यावा अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. तसेच पुढील ३ वर्षामध्ये प्रत्येक वर्षी नियुक्त करावयाची पोलीस कर्मचाऱ्यांची ११,००० पदे नियमित भरण्याची कार्यवाही करण्यात यावी.***

*- अंदाज समितीची शिफारस - २००३*

# गुन्हे

## राज्यभरात वर्ष २०१४ मध्ये ३लाख ४५ हजार गुन्ह्यांची नोंद तर १ लाख २४ हजार गुन्हे तपासासाठी प्रलंबित

तक्ता क्र. २

| अ.क्र. | गुन्ह्यांचे प्रकार | तपासासाठी एकूण गुन्हे | तपासकार्य नाकारलेले व तपास न लागलेले गुन्हे | तपासकार्य पूर्ण झालेले गुन्हे/तपासाअंती निर्गती करण्यात आलेले गुन्हे | इतर पोलीस ठाण्यात बदली झालेले गुन्हे | तपासासाठी प्रलंबित गुन्हे |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | खून | ४०४३ | ० | २६७० | ९ | १३८२ |
| २. | खुनाचा प्रयत्न | ४०५३ | ० | २६१३ | ४ | १४४४ |
| ३. | सदोष मनुष्यवध | २८७ | ० | १७१ | २ | ११८ |
| ४. | बलात्कार | ४६३१ | ० | ३४३८ | २ | ११९५ |
| ५. | अपहरण व पळवूण नेणे | ५७१५ | ० | ३७९३ | ५ | १९२७ |
| ६. | दरोडा | १५४९ | ० | ८८५ | ० | ६६४ |
| ७. | दरोड्याची पूर्वतयारी व त्यासाठी एकत्र जमणे. | ४६३ | ० | २९३ | २ | १७२ |
| ८. | जबरी चोरी | १४७३९ | ० | ९४६६ | २ | ५२७५ |
| ९. | घरफोडी | २९००६ | ० | १७१७१ | २ | ११८३७ |
| १०. | चोरी | ९५६६७ | १६ | ५६२८३ | ४ | ३९४०४ |
| ११. | गर्दी – मारामारी (दंगल) | ११४३९ | ० | ७७६० | ० | ३६७९ |
| १२. | अन्यायाने विश्वासघात | ५०८३ | ३ | १९५८ | ३० | ३१५८ |
| १३. | ठकबाजी (लुबाडणूक) | २१९२३ | १५ | ९९५९ | ४९ | १२०२८ |
| १४. | बनावट नाणी | १०९९ | ० | २०१ | २ | ९०० |
| १५. | जाळपोळ | १७९४ | ० | ११८० | ० | ६१४ |
| १६. | दुखापत | १२९२० | ० | ८१२७ | २ | ४७९५ |
| १७. | हुंडाबळी | ३७९ | ० | २७९ | ० | १०० |
| १८. | विनयभंग | १३१४२ | २ | १०००१ | ४ | ३१४७ |
| १९. | छेडछाड | २६८६ | ० | १५७५ | ० | ११११ |
| २०. | पती किंवा त्याच्या नातेवाईकांकडून छळ | १०८७७ | २ | ७६९६ | ५ | ३१८८ |
| २१. | निष्काळजीपणामुळे मृत्यूस कारणीभूत | १७२५५ | ० | १२६१९ | २ | ४६३८ |
| २२. | इतर भा.दं.वि. गुन्हे | ८६३५० | ० | ६२२८६ | १७ | २४०८१ |
| | **एकूण गुन्हे** | **३४५१००** | **३८** | **२२०४२४** | **१४३** | **१२४८५७** |

*(स्रोत: महाराष्ट्रातील गुन्हे - २०१४)*

☞ **वर्ष २०१४ मध्ये महाराष्ट्र राज्यात ३ लाख ४५ हजार १०० इतक्या गुन्ह्यांची नोंद झालेली आहे. तर त्याच वर्षी १ लाख २४ हजार ८५७ गुन्हे तपासासाठी प्रलंबित होते.**

☞ **वर्ष २०१४ मध्ये भा.दं.वि. खालील २ लाख २० हजार ४२४ गुन्ह्यांची तपासाअंती निर्गती करण्यात आली.**

☞ **वर्ष २०१४ मध्ये मागील वर्षाच्या प्रलंबित गुन्ह्यांसह तपासासाठी एकूण गुन्हे**

# वर्ष २०१४ मध्ये ९ प्रमुख शहरात ९८ हजार ४७३ गुन्ह्यांची नोंद

# एकूण राज्याच्या तुलनेत ३९ टक्के

तक्ता क्र. ३

| अक्र | गुन्ह्याचा प्रकार | राज्यातील एकूण गुन्हे | ९ शहरातील गुन्हे | ९ शहरांतील गुन्ह्यांचे राज्यातील गुन्ह्यांशी प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १) | खून | २६७० | ७०१ | २६.२५ |
| २) | खुनाचा प्रयत्न | २६१३ | ७५८ | २९.०१ |
| ३) | सदोष मनुष्यवध | १७१ | २४ | १४.०४ |
| ४) | सदोष मनुष्यवधाचा प्रयत्न | ११ | ३ | २७.२७ |
| ५) | बलात्कार | ३४३८ | १३३३ | ३८.७७ |
| ६) | बलात्काराचा प्रयत्न | १५ | ४ | २६.६६ |
| ७) | पळवून नेणे व अपहरण | ३७९३ | १६८६ | ४४.४५ |
| ८) | दरोडा | ८८५ | २४४ | २७.५७ |
| ९) | दरोड्यासाठी तयारी करणे एकत्र येणे | २९३ | १३४ | ४५.७३ |
| १०) | जबरी चोरी | ९४६६ | ५७०५ | ६०.२७ |
| ११) | घरफोडी | १७१७१ | ८६९१ | ५०.६१ |
| १२) | चोरी | ५६२८३ | २६४१७ | ४६.०४ |
| १३) | बेकायदेशीरपणे एकत्र येणे | १००६ | १६९ | १६.७९ |
| १४) | गर्दी - मारामारी (दंगल) | ७७६० | १५६४ | २०.१५ |
| १५) | अन्यायाने विश्वासघात | १९५८ | १०८९ | ५५.६२ |
| १६) | फसवणूक | ९९५९ | ५८०३ | ५८.२७ |
| १७) | बनावट नाणी/नोटा | २०१ | १११८ | ५१.२४ |
| १८) | जाळपोळ | ११८० | २३६ | २०.०० |
| १९) | दुखापत | ८१२७ | ३७०६ | ४५.६० |
| २०) | हुंडाबळी | २७९ | ८० | २८.६७ |
| २१) | विनयभंग | १०००१ | ३५८८ | ३५.८७ |
| २२) | छेडछाड (लैंगिक छळ) | १५७५ | ६३५ | ४०.३१ |
| २३) | पती किंवा नातेवाईकांकडून छळ | ७६९६ | २१९४ | २८.५१ |
| २४) | निष्काळजीपणामुळे मृत्यू | १२६१९ | २५५१ | २०.२२ |
| २५) | खंडणी | ७८० | ४८७ | ६२.४३ |
| २६) | मोटार अपघात | २६०६० | ९८२९ | ३७.७१ |
| २७) | मानवी तस्करी | १०८ | १०७ | ९९.०७ |
| २८) | इतर भा. दं. वि. गुन्हे | ६२२८६ | १९६१७ | ३१.५० |
| | **एकूण भा. दं. वि. खाली दखलपात्र गुन्हे** | **२४८४०४** | **९८४७३** | **३९.२३** |

*(९ प्रमुख शहरे :नागपूर,पुणे,ठाणे,मुंबई,नाशिक,औरंगाबाद,सोलापूर,नवी मुंबई, अमरावती(स्त्रोत:महाराष्ट्रातील गुन्हे - २०१४)*

☞ **महाराष्ट्रातील नऊ मोठ्या शहरात (नागपूर, पुणे, ठाणे, मुंबई, नाशिक, औरंगाबाद, सोलापूर, नवी मुंबई आणि अमरावती) पोलीस आयुक्तालय पध्दती आहे.**

☞ **सन २०१४ नुसार या नऊ प्रमुख शहराची लोकसंख्या ३ कोटी ३१ लाख आहे.**

☞ **एकूण भा.दं.वि. गुन्ह्यांपैकी ३९ टक्के गुन्ह्यांची नोंद ही या नऊ प्रमुख शहरात झालेली आहे.**

☞ **एकूण भा.दं.वि. गुन्ह्यांपैकी वर्ष २०१४ मध्ये चोरी या प्रकाराखाली राज्यात ५६ हजार २८३ गुन्ह्यांची नोंद झाली असून ९ प्रमुख शहरात २६ हजार ४१७ गुन्ह्यांची नोंद झाली आहे.**

☞ **वर्ष २०१४ मध्ये ९ प्रमुख शहरात ७०१ खून झाले असून सर्वात जास्त मुंबई १८३, पुणे १३८ व ठाणे ११७ या महानगरात झाले आहेत. तर खुनाच्या प्रयत्नात मुंबई व पुणे आघाडीवर असून प्रत्येकी १८१ गुन्हे घडले आहेत.**

☞ **प्रमुख ९ शहरातील २६हजार ४१७ प्रकरणे घडली असून सर्वात जास्त १० हजार १०१ (३८.२३ टक्के) प्रकरणे एकट्या मुंबई शहरात घडली आहेत.**

# वर्ष २०१४ मध्ये मुंबईत घडले ४० हजार ३३४ गुन्हे

## ९ प्रमुख शहरात मुंबईचा वाटा ४० टक्के

तक्ता क्र. ४

| अक्र | गुन्ह्याचा प्रकार | ९ शहरातील गुन्हे | मुंबई शहरातील गुन्हे | मुंबईचे ९ शहराशी प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १) | खून | ७०१ | १८३ | २६.१० |
| २) | खुनाचा प्रयत्न | ७५८ | १८१ | २३.८७ |
| ३) | सदोष मनुष्यवध | २४ | ४ | १६.६६ |
| ४) | सदोष मनुष्यवधाचा प्रयत्न | ३ | १ | ३३.३३ |
| ५) | बलात्कार | १३३३ | ६०७ | ४५.५३ |
| ६) | बलात्काराचा प्रयत्न | ४ | २ | ५०.०० |
| ७) | पळवून नेणे व अपहरण | १६८६ | ५४१ | ३२.०८ |
| ८) | दरोडा | २४४ | ३४ | १३.९३ |
| ९) | दरोड्यासाठी तयारी करणे एकत्र येणे | १३४ | १४ | १०.४४ |
| १०) | जबरी चोरी | ५७०५ | २०९४ | ३६.७० |
| ११) | घरफोडी | ८६९१ | ३०५५ | ३५.१५ |
| १२) | चोरी | २६४१७ | १०१०१ | ३८.२३ |
| १३) | बेकायदेशीरपणे एकत्र येणे | १६९ | ६ | ३.५५ |
| १४) | गर्दी-मारामारी (दंगल) | १५६४ | ४०९ | २६.१५ |
| १५) | अन्यायाने विश्वासघात | १०८९ | ६७२ | ६१.७० |
| १६) | फसवणूक | ५८०३ | २५९४ | ४४.७० |
| १७) | बनावट नाणी/नोटा | १११८ | १०१९ | ९१.१४ |
| १८) | जाळपोळ | २३६ | ५४ | २२.८८ |
| १९) | दुखापत | ३७०६ | २००६ | ५४.१२ |
| २०) | हुंडाबळी | ८० | २२ | २७.५ |
| २१) | विनयभंग | ३५८८ | १६२६ | ४५.३१ |
| २२) | छेडछाड | ६३५ | ३६३ | ५७.१६ |
| २३) | पती किंवा नातेवाईकांकडून छळ | २१९४ | ५६३ | २५.६६ |
| २४) | निष्काळजीपणामुळे मृत्यू | २५५१ | ५८४ | २२.८९ |
| २५) | खंडणी | ४८७ | २४७ | ५०.७१ |
| २६) | मोटार अपघात | ९८२९ | ४१२९ | ४२.०० |
| २७) | मानवी तस्करी | १०७ | ८४ | ७८.५० |
| २८) | इतर भा. दं. वि. गुन्हे | १९६१७ | ९१४० | ४६.५९ |
| | एकूण भा. दं. वि. खाली दखलपात्र गुन्हे | ९८४७३ | ४०३३४ | ४०.९५ |

*(स्त्रोत: महाराष्ट्रातील गुन्हे -२०१४)*

☞ **राज्यातील प्रमुख नागपूर, पुणे, ठाणे, मुंबई, नाशिक, औरंगाबाद, सोलापूर, नवी मुंबई, अमरावती या नऊ शहरांमधील नोंदविलेल्या गुन्ह्यांचे प्रमाण पहाता एकटया मुंबई शहरातील गुन्ह्यांचे प्रमाण हे ४०.९४ टक्के इतके आहे.**

☞ **राज्यातील प्रमुख नागपूर, पुणे, ठाणे, मुंबई, नाशिक, औरंगाबाद, सोलापूर, नवी मुंबई, अमरावती या नऊ शहरांशी तुलना करता मुंबईमध्ये बनावट नोटांबाबत ९१.९४ टक्के, मानवी तस्करी ७८.५०टक्के, अन्यायाने विश्वासघात (Criminal Breach of Trust) या गुन्ह्यांचे प्रमाण ६१.७० टक्के आणि विनयभंग या गुन्ह्यांचे प्रमाण ४५.३१ टक्के असून ते सर्वाधिक आहे.**

☞ **राज्यातील प्रमुख नऊ शहरांशी (नागपूर, पुणे, ठाणे, मुंबई, नाशिक, औरंगाबाद, सोलापूर, नवी मुंबई, अमरावती) तुलना करता मुंबईमध्ये नोंदविलेल्या गुन्ह्यांमध्ये फसवणुकीबद्दलच्या गुन्ह्याचे प्रमाण ४४.७० टक्के तर दुखापतीचे ५४.१२ प्रमाण टक्के, चोरीचे प्रमाण ३८.२३टक्के व बलात्काराचे प्रमाण हे ४५.३३ टक्के दिसून येते.**

# अनुसूचित जातीवरील अत्याचाराचे गुन्हे १ हजार ७६८

## अनुसूचित जाती व जमातींच्या नागरिकांवरील अत्याचाराचे प्रमाण वाढले

तक्ता क्र. ५

| गुन्ह्याचा प्रकार | वर्ष | | | | | | २००९ शी | २०१३शी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २००९ | २०१० | २०११ | २०१२ | २०१३ | २०१४ | २०१४ ची % | २०१४ची % |
| खून | २७ | २४ | २६ | ३६ | ४० | ४३ | ५९.२६ | ७.५० |
| बलात्कार | १०५ | ८९ | ९५ | ९७ | १७९ | १७९ | ७०.४८ | ०.०० |
| अपहरण व पळवून नेणे | १० | २५ | १२ | २३ | ३३ | ३७ | २७०.०० | १२.१२ |
| दरोडा | २० | २२ | १६ | १६ | २६ | २० | ०.०० | -२३.०८ |
| जबरी चोरी | ८ | २० | १२ | १३ | २२ | १८ | १२५.०० | -१८.१८ |
| जाळपोळ | ८ | १२ | ७ | ९ | १० | ११ | ३७.५० | १०.०० |
| दुखापत | ५६ | ७७ | ८४ | ८१ | १६७ | २६ | -५३.५७ | -८४.४३ |
| नागरी हक्क संरक्षण कायदा | २४ | २५ | १० | ५ | २१ | ५ | -७९.१७ | -७६.१९ |
| अनु. जाती/ जमाती प्रतिबंधक कायदा | २९१ | ३१९ | ३०४ | २६७ | २७७ | ३२९ | १३.०६ | १८.७७ |
| इतर गुन्हे | ५४७ | ५१९ | ५७७ | ५४४ | ९०३ | ४७५ | -१३.१६ | -४७.४० |
| **एकूण** | **१०९६** | **११३२** | **११४३** | **१०९१** | **१६७८** | **१७६८** | **६१.३१** | **५.३६** |

*(स्त्रोत: महाराष्ट्रातील गुन्हे - २०१४)*

- ☞ **वर्ष २००९शी तुलना करता वर्ष २०१४ मध्ये अनुसूचित जातीवरील अत्याचारांतर्गत नोंदविलेल्या गुन्ह्यांमध्ये प्रामुख्याने अपहरण व पळवून नेण्याच्या प्रमाणात २७० टक्के, जबरी चोरी प्रमाणात १२५ टक्के तर बलात्कारात ७०.४८ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. तर खुनाच्या गुन्ह्यात ५९.२६टक्के वाढ झाली आहे.**

- ☞ **वर्ष २०१३ शी तुलना करता वर्ष २०१४ मध्ये अनुसूचित जातीवरील अत्याचारांतर्गत नोंदविलेल्या गुन्ह्यांमध्ये अपहरण व पळवून नेणे या गुन्ह्यात १२.१२ टक्के इतकी वाढ झालेली आहे. तर खुनासारख्या गुन्ह्यात ७.५ टक्के इतकी वाढ झाली आहे.**

- ☞ **अनुसूचित जातीवरील अत्याचारांतर्गत नोंदविलेल्या गुन्ह्यांच्या प्रकारामध्ये अनुसूचित जाती/जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार ठरणाऱ्या गुन्ह्यांची संख्या पहाता वर्ष २००९ शी तुलना करता वर्ष २०१४ मधील या कायद्याखाली दाखल झालेल्या गुन्ह्यांचे प्रमाण १३.०६ टक्क्यांनी घटले आहे.**

- ☞ **वर्ष २०१४ मध्ये घडलेल्या अनुसूचित जातीवर झालेल्या अत्याचारात अनुसूचित जाती/जमाती प्रतिबंधक कायद्यांतर्गत ३२९ गुन्ह्यांची नोंद झाली असून बलात्काराच्या १७९ गुन्ह्यांची नोंद झाली आहे.**

# अनुसूचित जमातींवरील अत्याचारांचे वर्ष २०१४ मध्ये ४४३गुन्हे
## मागील वर्षाच्या तुलनेत गुन्ह्यांत वाढ

तक्ता क्र. ६

| गुन्ह्याचा प्रकार | वर्ष | | | | | | २००९ शी २०१४ ची % | २०१३ शी २०१४ ची % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २००९ | २०१० | २०११ | २०१२ | २०१३ | २०१४ | | |
| खून | ८ | ९ | १६ | ११ | ७ | २० | १५०.०० | १८५.७१ |
| बलात्कार | ५० | ४६ | ५७ | ५६ | ९१ | ८६ | ७२.०० | -५.४९ |
| अपहरण व पळवून नेणे | १ | ८ | ११ | ७ | ९ | ८ | ७००.०० | -११.११ |
| दरोडा | १ | १ | ३ | ४ | ६ | ० | -१००.०० | -१००.०० |
| जबरी चोरी | १ | १ | २ | ३ | २ | ५ | ४००.०० | १५०.०० |
| जाळपोळ | ६ | ७ | ४ | १ | ५ | ४ | -३३.३३ | -२०.०० |
| दुखापत | ६ | ११ | १८ | १७ | २९ | १० | ६६.६७ | -६५.५२ |
| नागरी हक्क संरक्षण कायदा | ० | ० | ० | १ | ८ | ० | ० | -१००.०० |
| अनु.जाती/जमाती प्रतिबंधक कायदा | ३७ | ५५ | ६१ | ५३ | ४५ | ५५ | ४८.६५ | २२.२२ |
| इतर गुन्हे | ११४ | १५४ | १४९ | १५५ | २१३ | ८६ | -२४.५६ | -५९.६२ |
| **एकूण** | २२४ | २९२ | ३२१ | ३०८ | ४१५ | ४४३ | ९७.७७ | ६.७५ |

*(स्त्रोत: महाराष्ट्रातील गुन्हे -२०१४)*

☞ **वर्ष २०१३शी तुलना करता वर्ष २०१४ मध्ये अनुसूचित जमातींवरील नोंदविलेल्या विविध गुन्ह्यांपैकी खून या गुन्ह्यामध्ये १८५ टक्के वाढ झाली आहे.**

☞ **वर्ष २००९ ची वर्ष २०१४शी तुलना करता अनुसूचित जमातींवरील नोंदविलेल्या गुन्ह्यांमध्ये जबरी चोरीचे प्रमाण ४०० टक्क्यांने वाढले आहे.**

☞ **वर्ष २०१३ मध्ये अनुसूचित जमाती प्रतिबंधक कायद्यानुसार ४५ गुन्हे नोंदविले गेले होते. वर्ष २०१४ मध्ये त्यात १०ने वाढ होऊन हे गुन्हे ५५ इतके झाले आहे.**

☞ **वर्ष २०१४ मध्ये अनुसूचित जमातीवरील बलात्काराची ८६ प्रकरणे घडली.**

# भ्रष्टाचार

## २ कोटी ४६ लाख २३ हजार ९७१रुपयांचा भ्रष्टाचार करताना वेगवेगळ्या विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना सापळा रचून पकडण्यात आले

तक्ता क्र. ७

**सापळा प्रकरणांमध्ये अटक केलेल्या व्यक्तींची वर्ग व खातेनिहाय माहिती**

| अक्र | खाते | वर्ग | | | | | | एकूण | सापळा प्रकरणातील मालमत्ता रुपये | एकूणाशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | ४ | इलोसे | खाव्य | | | |
| १. | महसूल | ६ | १० | २८३ | १८ | १ | ७३ | ३९१ | ३५,०५,८७१ | १४.२४ |
| २. | पोलीस | २० | २० | २७५ | २ | ७ | ४२ | ३६६ | ४०,८३,५०० | १६.५९ |
| ३. | महानगर पालिका | २ | ६ | ५० | ८ | ८ | १५ | ८९ | १६,१३,६७० | ६.५६ |
| ४. | पंचायत समिती | १ | ६ | ११७ | ४ | २९ | १८ | १७५ | १२,९०,३७० | ५.२४ |
| ५. | राज्य उत्पादन शुल्क | ३ | २ | ७ | ० | ० | ३ | १५ | ४६,४५,००० | १८.८६ |
| ६. | विक्रीकर विभाग | ३ | ४ | ३ | ० | ० | १ | ११ | २५,७४,००० | १०.४५ |
| | इतर विभाग | ४१ | ८१ | २९१ | २८ | २८ | ६८ | ५३७ | ६९,११,५६० | २८.०६ |
| | एकूण | ७६ | १२९ | १०२६ | ६० | ७३ | २२० | १५८४ | २,४६,२३,९७१ | १००.० |

*स्रोत: अॅन्टी करप्शन ब्युरो, महाराष्ट्र राज्याच्या संकेतस्थळावरुन माहिती प्राप्त (कालावधी १/१/२०१५ ते ३१/१२/२०१५)*

*टीप: इलोसे-इतर लोक सेवक, खाव्या: खाजगी व्यक्ती*

☞ **वर्ष २०१५ च्या अखेरपर्यंत २ कोटी ४६ लाख २३ हजार ९७१ रुपयांची लाच घेताना वेगवेगळ्या विभागातील कर्मचाऱ्यांना पकडण्यात आले आहे. त्यामध्ये महसूल, पोलीस, महानगर पालिका, पंचायत समिती राज्य उत्पादन शुल्क, विक्रीकर विभाग या प्रमुख विभागांसह इतर विभागांचा समावेश आहे. या प्रकरणांमध्ये १ हजार ३६४ कर्मचारी गुंतले होते. त्यामध्ये ७६ अधिकारी हे दर्जा एकचे तर १२९ अधिकारी हे दर्जा २ चे होते. तर २२० खाजगी व्यक्तींचा समावेश होता.**

☞ **वर्ष २०१५ मध्ये राज्य उत्पादन शुल्क खात्या अंतर्गत १२ कर्मचाऱ्यांना व ३ खाजगी व्यक्तींना ४६ लाख ४५ हजार रुपयाची लाच घेताना पकडण्यात आले. एकूण पकडण्यात आलेल्या रकमेमध्ये हे प्रमाण १८.८६ टक्के आहे. त्यामध्ये दर्जा एकच्या ३ अधिकाऱ्यांचा समावेश आहे.**

☞ **वर्ष २०१५ अखेर पर्यंत ४० लाख ८३ हजार ५०० रुपयांची लाच घेताना पोलिसांना पकडण्यात आले आहे. ही रक्कम एकूण पकडल्या गेलेल्या रकमेच्या १६.५९ टक्के. त्यामध्ये ३२४ कर्मचाऱ्यांचा समावेश असून एक व दुसऱ्या दर्जाचे प्रत्येकी २० कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.**

☞ **वर्ष २०१५ मध्ये महसुल विभागांतर्गत ३५ लाख ५ हजार ८७१ रुपयांची मालमत्ता पकडण्यात आली असून एकूण पकडलेल्या रकमेच्या ती १४.२४ टक्के आहे. या प्रकरणांमध्ये ३१८ कर्मचाऱ्यांचा सहभाग असून एक दर्जाचे ६ व दुसऱ्या दर्जाच्या १० अधिकाऱ्यांचा समावेश आहे. तसेच या प्रकरणांमध्ये ७३ खाजगी व्यक्तींचा समावेश होता.**

# पोलिसांविरुध्दच ६ हजार ५२८ तक्रारी
## सर्वसामान्य जनता हतबल!

तक्ता क्र. ८

| वर्ष | पोलिसांविरुध्द तक्रारी | खातेनिहाय चौकशी | दंडाधिकाऱ्या मार्फत चौकशी | न्यायालयीन चौकशी | खोट्या तक्रारी/निराधार आरोप | दाखल गुन्हे | तपासाअंती करण्यात आलेली कारवाई वा शिक्षा | न्यायालयात पाठविलेले दोषारोप |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०११ | ५५४१ | ५५८ | २ | ७३ | ३८४२ | ३९९ | ११७ | १९१ |
| २०१२ | ६९२५ | ३९८ | १४ | ६५ | ४५४९ | ३८० | ९० | १७३ |
| २०१३ | ७२८० | ९५१ | १ | ८६ | ४१७२ | ४४२ | ८०१ | १७२ |
| २०१४ | ६५२८ | ७२७ | ८ | ६० | २३५५ | ४८७ | ४३२ | १६७ |

*(स्त्रोत:महाराष्ट्रातील गुन्हे - २०१४)*

- ☞ वर्ष २०१४ मध्ये ४३२ पोलिसांविरुद्ध खातेंनिहाय चौकशीचे काम पूर्ण करण्यात आले. त्यानुसार राज्य पातळीवर १९ पोलिसांना बडतर्फ केले गेले यापैकी सर्वाधिक ठाणे ग्रामीण, ११, सांगली, २ व नवी मुंबई २ यांचा समावेश होता.
- ☞ वर्ष २०११शी तुलना करता वर्ष २०१२ मध्ये १ हजार ३८४ पोलिसांविरुध्दच्या तक्रारीत वाढ. तर वर्ष २०१२ शी तुलना करता २०१३ मध्ये ३५५ ने वाढ झाली आहे. मात्र २०१४ मध्ये २०१३ च्या तुलनेत ७५२ ने घट
- ☞ पोलिसांवरील खोट्या तक्रारींचे प्रमाणही वाढले असून वर्ष २०१४ मध्ये २ हजार ३५५ खोट्या तक्रारी दाखल झाल्या आहेत.
- ☞ वर्ष २०१४ मध्ये ७२७ प्रकरणांतर्गत पोलिसांवर खाते निहाय कारवाईची शिफारस करण्यात आली होती.
- ☞ वर्ष २०१४ मध्ये १६७ प्रकरणे न्यायालयात पाठविण्यात आली.

## राज्यातील लाचखोरी झाली दामदुप्पट

सरकारी कर्मचाऱ्यांकडून 'चिरीमिरी किंवा चहापाण्या' शिवाय काम होत नाही, असा अनेकांचा अनुभव आहे. वर्ष २०१५ मध्ये या लाचेच्या रकमेत वाढ झाल्याचे समोर आले आहे. पोलीस, महसुल आणि पंचायत समित्यांमध्ये काम करणारे अधिकारी, कर्मचारी किमान तीन ते कमाल ५० हजार रुपये हातात आल्याशिवाय काम करत नसल्याचे स्पष्ट झाले आहे. वर्ष २०१४ च्या तुलनेत २०१५ मध्ये एसीबीच्या कारवायांचा वेग मंदावला आहे. वर्ष २०१४ मध्ये एकूण सापळ्यांची संख्या १ हजार २४५ इतकी होती. तर २०१५ मध्ये त्यात घट होऊन १ हजार २३४ झाली. बेहिशेबी संपत्ती जमविण्याची प्रकरणे उघडकीस येण्याच्या संख्येतही घट झाली असून २०१४ मध्ये ४८ च्या तुलनेत २०१५ मध्ये ही संख्या ३४ वर आली आहे.लाच मागण्यात महसुल, पोलीस पंचायत समित्यांमध्ये काम करणाऱ्यांची संख्या सर्वात अधिक आहे.

## राज्यात १ लाख २० हजार ४४७ पोलीस शासकीय निवासापासून वंचित

**महाराष्ट्र राज्य पोलीस संख्याबळ आणि त्यांना उपलब्ध झालेली शासकीय निवासस्थाने**

तक्ता क्र.९

| ३१ जानेवारी, २०१६ पर्यंत | | | | |
|---|---|---|---|---|
| पद | कार्यरत संख्याबळ | उपलब्ध निवासस्थाने | निवासस्थान नसलेले | निवासस्थान नसलेल्यांची टक्केवारी |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| पोलीस अधिकारी | १७०९० | ५६६५ | ११४२५ | ६६.८५ |
| पोलीस कर्मचारी | १८९८७२ | ८०८५० | १०९०२२ | ५७.४१ |
| **एकूण** | **२०६९६२** | **८६५१५** | **१२०४४७** | **५८.१९** |

*स्त्रोत: माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती, ०८ मार्च, २०१६*

☞ **महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालयातून प्राप्त झालेल्या माहितीनुसार राज्यात २ लाख ६ हजार ९६२ एवढी पोलिसांची संख्या असून त्यापैकी केवळ ८६ हजार ५१५ (४१.८०%) अधिकारी व कर्मचाऱ्यांकडे शासकीय निवासस्थाने आहेत तर १ लाख २० हजार ४४७ पोलीस निवास स्थानांपासून वंचित आहेत.**

☞ **राज्यातील १७ हजार ९० अधिकाऱ्यांपैकी केवळ ५ हजार ६६५ अधिकाऱ्यांना शासन निवासस्थाने देऊ शकले याचा अर्थ आजही ६६.८५% अधिकारी हे शासकीय निवासस्थानांपासून वंचित आहेत.**

☞ **राज्यातील पोलीस कर्मचाऱ्यांची संख्या १ लाख ८९ हजार ८७२ आहे. त्यापैकी केवळ ८० हजार ८५० पोलीस कर्मचाऱ्यांना शासन निवासस्थान उपलब्ध करून देऊ शकले. तर आजही १ लाख ९ हजार २२ पोलीस कर्मचाऱ्यांना निवासस्थाने उपलब्ध नाहीत.**

## २८ हजार ९९५ मुंबई-पोलीस आजही घरांच्या प्रतिक्षेत

**मुंबई पोलीस आयुक्तालयातील प्रत्यक्ष संख्याबळ व त्यांना उपलब्ध झालेली निवासस्थाने**

तक्ता: क्र.१०

| २ मार्च, २०१६ पर्यंत | | | | |
|---|---|---|---|---|
| पद | प्रत्यक्ष संख्याबळ | उपलब्ध निवासस्थाने | निवासस्थान नसलेले | निवासस्थान नसलेल्यांची टक्केवारी |
| पोलीस अधिकारी | ५८०२ | १९५० | ३८५२ | ६६.३९ |
| पोलीस कर्मचारी | ४४६९३ | १९५५० | २५१४३ | ५६.२५ |
| **एकूण** | **५०४९५** | **२१५००** | **२८९९५** | **५७.४२** |

*स्त्रोत: माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती, २ मार्च, २०१६*

☞ **मुंबई पोलीस आयुक्तालयातून प्राप्त झालेल्या माहितीनुसार मुंबई पोलिसांचे प्रत्यक्ष संख्याबळ ५० हजार ४९५ आहे. त्यामध्ये ५ हजार ८०२ पोलीस अधिकारी व ४४ हजार ६९३ पोलीस कर्मचारी आहेत.**

☞ **राज्यात २५ हजार १४३ (५६.२५ टक्के) पोलीस कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी शासकीय निवासस्थाने उपलब्ध नसून ३ हजार ८५२ (६६.३९टक्के) पोलीस अधिकाऱ्यांना निवासस्थाने नाहीत.**

# राज्य माहिती आयोगातील विविध कार्यालयात ५० पदे रिक्त
# मंजूर पदांमध्ये रिक्त पदांचे प्रमाण ३७ टक्के

तक्ता क्र. ११

| पद | कार्यालय/खंडपीठ | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुख्यालय | औरंगाबाद | कोकण | पुणे | नाशिक | अमरावती | नागपूर | बृहन्मुंबई | एकूण मंजूर पदे | भरलेली पदे | एकूण रिक्त पदे |
| | रिक्त पदे | | | | | | | | | | |
| सचिव | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ० |
| उपसचिव | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ७ | ६ | १ |
| कक्ष अधिकारी | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | १ | १६ | १३ | ३ |
| सहाय्यक | ३ | ० | १ | ० | ० | १ | ० | २ | ३१ | २४ | ७ |
| लघुलेखक (उच्च श्रेणी) | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | ८ | ६ | २ |
| लघुलेखक (निम्न श्रेणी) | १ | ० | १ | ० | १ | ० | १ | ० | ८ | ४ | ४ |
| लिपिक- टंकलेखन | ३ | १ | ० | २ | १ | ३ | ० | ३ | ३३ | २० | १३ |
| वाहन चालक | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | ० | ८ | २ | ६ |
| शिपाई | ३ | २ | २ | ० | ३ | १ | १ | २ | २४ | १० | १४ |
| **एकूण** | १० | ५ | ६ | ३ | ७ | ७ | ४ | ८ | १३६ | ८६ | ५० |

*स्रोत: माहितीच्या अधिकाराखाली प्राप्त माहिती, २५ फेब्रुवारी, २०१६ (रिक्त पदांचा कालावधी ३१/१/२०१६ पर्यंत)*

- ☞ **माहितीच्या अधिकाराखाली मागविलेल्या माहितीत असे आढळून आले की फेब्रुवारी २०१६ पर्यंत मिळालेल्या माहितीनुसार १३६ पैकी ५० (३६.७६%) पदे रिक्त आहेत.**
- ☞ **सर्वात जास्त लिपिक १३ व शिपाई १४ पदे रिक्त असून एकूण ५०रिक्त पदांमध्ये हे प्रमाण (२८%) आहे.**
- ☞ **कोकण खंडपीठामध्ये १ उपसचिवांचे पद रिक्त आहे.**
- ☞ **सहाय्यकांची ७ पदे रिक्त असून मुख्यालयात ३, बृहन्मुंबई मध्ये २, कोकणात व अमरावतीमध्ये प्रत्येकी एक पद रिक्त आहे.**
- ☞ **माहिती आयोग मुख्यालयातच सर्वात जास्त रिक्त पदे असून रिक्त पदांची संख्या १० (२०%), बृहन्मुंबईमध्ये ८ (१६%), नाशिक व अमरावतीत प्रत्येकी ७ (१४%), कोकण ६ (१२%), औरंगाबाद ५ (१०%), नागपूर ४ (८%), पुणे ३ (६%) पदे रिक्त आहेत.**

## पोलिसांची १३ हजार पदे रिक्त, अपुऱ्या पोलिसांमुळे मुंबईसह राज्य असुरक्षित

**राज्यातील पोलीसांचे एकूण मंजूर संख्याबळ २ लाख २० हजार इतकी पदे मंजूर असून त्यापैकी १३ हजार १०१ पदे रिक्त असल्याचे वास्तव समोर आले आहे. अपुऱ्या मनुष्यबळामुळे पोलिसांवर कामाचा ताण येत आहे. पोलीस दलातील अपुरे मनुष्यबळ, हुषार तपास अधिकाऱ्यांची कमतरता यामुळे मुंबई शहर वर्षागणिक सुरक्षित होत असल्याचा निष्कर्ष प्रजा फाऊंडेशनने पोलिसिंग, कायदा व सुव्यवस्थेसंबंधात काढलेल्या अहवालात म्हटले आहे. दक्षिण मध्य मुंबईतच सर्वाधिक गुन्ह्यांची नोंद झाली असून या परिसरातील ३६ टक्के नागरिकांना मुंबईत सुरक्षित वाटत नाही. गेल्या ५ वर्षात बलात्कार आणि विनयभंगाच्या तक्रारी नोंदविण्याचे प्रमाण वाढले असून तपास अधिकाऱ्यांच्या कमतरतेमुळे गुन्हेसिध्दीचे प्रमाण घटले आहे. तसेच सामान्य नागरिकांच्या तक्रारी ऐकण्यासाठी असलेल्या पोलीस नियंत्रण कक्षात ५१ टक्के पदे रिक्त असल्याचे धक्कादायक वास्तव उघडकीस आले आहे.**

# पोलिसांच्या रिक्त पदांमुळे गुन्हेगारीत होतेय वाढ

- ☞ सन २०१०-११ ते २०१४-१५ या ५ वर्षात बलात्काराच्या घटनांमध्ये ३९० टक्के तर विनयभंगाच्या घटनांमध्ये ३४७ टक्के वाढ झाली आहे.
- ☞ दक्षिण मुंबईत सर्वाधिक म्हणजे ९२०३ गुन्ह्यांची नोंद झाली आहे.
- ☞ पोलीसांची सर्वाधिक रिक्त पदे उत्तर-पश्चिम मुंबईत १२ टक्के आहेत.
- ☞ पोलीस नियंत्रण कक्षात ५१ टक्के कर्मचाऱ्यांची कमतरता आहे.
- ☞ शहरात बलात्काराच्या घटना वाढत असूनही गेल्या २ अधिवेशनात या संदर्भात आमदारांकडून केवळ ६ प्रश्न विचारण्यात आले आहे.
- ☞ वरील सर्वेक्षण अहवालातील निष्कर्ष लक्षात घेता लोकप्रतिनिधीही शहरातील गुन्ह्याविषयी कमालीचे उदासीन असल्याचे दिसून आले आहेत. तरी गेल्या ५ वर्षात बलात्कार-विनयभंगाचे प्रमाण झपाट्याने वाढले असून दुसरीकडे गुन्ह्यांच्या दोषसिध्दीचे प्रमाण घटले आहे. पोलीस दलात संपूर्ण राज्यात १३ हजार पदे रिक्त असून त्याकडे तात्काळ लक्ष देण्याची गरज आहे.

# राज्य शासन एसटी महामंडळाला कर्जाच्या खाईतून बाहेर काढण्यासाठी खालील बाबींकडे लक्ष देणार का?

- ☞ एसटीला पथकरातून वगळण्याचा शासनाचा दावा फोल ठरला आहे. कारण गेल्या वर्षी रु.१४६ कोटी पथकर होता. त्यामध्ये अत्यंत अल्प घट होऊन यावर्षी रु. १२९ कोटी पथकर भरावा लागला आहे.
- ☞ शेजारच्या गुजरात राज्यातील सरकार त्यांच्या एसटीला महसुली खर्चासाठी व भांडवली खर्चासाठी साधारणत: वर्षाला अडीच हजार कोटी रुपयांचे अनुदान देते. त्याचप्रमाणे कर्नाटक सरकारसुद्धा एसटीला भरघोस मदत करते. इतर राज्याच्या तुलनेत एसटीकडे महाराष्ट्र सरकारचे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे.
- ☞ राज्य शासनाने एसटीला मदत करण्याऐवजी सक्तीने तोटयात चालणाऱ्या वाहतुकीच्या फेऱ्यांमुळे महामंडळाचे वर्षाला रु.५०० कोटींचे नुकसान होत आहे.
- ☞ कर्नाटक राज्यात ५३ आसनी एसटी आहे तर महाराष्ट्रात ४० इतकीच आसन क्षमता आहे. ती वाढवल्यास प्रतिकिलोमीटर उत्पन्न वाढेल. त्याप्रमाणात भांडवली गुंतवणूक वाढून कर्मचारी वर्ग देखील कमी लागेल.
- ☞ एसटी महामंडळाचे पूर्णत: बदलत्या परिस्थितीत संगणकीकरण होणे गरजेचे. ज्यामुळेही खर्चात मोठी कपात येईल.
- ☞ कारागृहातील कर्मचारी यांची एसटी परिवहनमधून होणारी वाहतूक, विद्यार्थिनींना प्रवासात मिळणारी सवलत याबाबतचा निधी शासनाने वेळच्या वेळी एसटीला परत देणे आवश्यक आहे.
- ☞ एसटी दिवसेंदिवस तोट्याच्या खाईत चालली आहे. याला राज्य सरकारचे धोरण व एसटी बद्दलची अनास्था जबाबदार आहे. तरी याबाबत राज्य शासनाने आज गांभीर्याने विचार करण्याची वेळ आलेली आहे.

## एसटीच्या मार्गात सरकारी खड्डे

एसटी हे खेड्यापाड्यातील व दुर्गम भागातल्या प्रवाशाला दळणवळणाचे एकमेव साधन आहे. दिवसेंदिवस अवैध प्रवासी वाहतुकीमुळे महामंडळाचे वर्षाकाठी दोन ते अडीच हजार कोटींचे नुकसान होत आहे. आज एसटीच्या १८ हजार ८०६ बसगाड्या आहेत. त्या १८ हजार ७३५ बसमार्गावर त्यांचा प्रवास चालतो. एसटीचा वार्षिक अपेक्षित उत्पन्न ८ हजार ६९८ कोटी आहे. तर अपेक्षित खर्च ९ हजार १७४ कोटी आहे. सरकारकडून एसटीला येणे १ हजार ५३० कोटी आहे. तर एसटीचा संचित तोटा १ हजार ६९० कोटी आहे.